# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

**औरंगाबाद – ४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)**

**नॅक 'अ' दर्जा प्राप्त**

**प्राध्यापक बी.ए. चोपडे**
एम. एस्सी., पीएच.डी. (नॉटींगहॅम विद्यापीठ, इंग्लंड)
फॉगर्टी फेलो (इलीनॉइस विद्यापीठ, शिकागो, यू. एस. ए.)

कुलगुरू

दुरध्वनी : ०२४०-२४०३३९९/२४०३४००
कार्यालय : ०२४०-२४०३१११
फॅक्स : ०२४०-२४०३११३/२४०३३३५
E-mail : vc@bamu.net
Website : www.bamu.ac.in

पत्र क्र. परीक्षा/व्हिसी/२०१५
दिनांक १९ ऑक्टोबर २०१५

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.

महोदय/महोदया,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१५ च्या पदवी / पदव्युत्तर अभ्सासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. विद्यापीठाने निश्चित केलेल्या निर्धारित वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा घेण्याच्या प्रयत्नात महाविद्यालयातील प्राचार्य/प्राध्यापक व परीक्षेत सहभागी सर्वांच्या सहकार्याने परीक्षा सुरुळीत पार पडत आहेत.

परीक्षा निर्धारित वेळेत सुरु झाल्याने निकालही विहित मुदतीत वेळेत घोषित होणे ही आपणा सर्वांची सामुहिक जबाबदारी आहे. म्हणून मूल्यांकनाच्या कार्यासाठी आपल्या महाविद्यालयात कार्यरत विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षकांना मूल्यांकनाच्या कार्यासाठी जिल्हा मूल्यांकन केंद्रावर तात्काळ पाठवावे आणि तत्पूर्वी मूल्यांकन केंद्रात उत्तरपत्रिका तपासण्यासंबंधीच्या जबाबदारीची जाणीव करुन द्यावी.

परीक्षा विभागात आयोजित केलेल्या विद्यापीठाशी संलग्नित जिल्हा मूल्यांकन केंद्र/ मूल्यांकन केंद्राच्या प्रमुख व परीक्षा नियंत्रक तथा परीक्षा विभागातील अधिकारी यांच्या दरम्यान झालेल्या बैठकीदरम्यान त्यांच्या काही अडचणी मांडल्या, त्या खालीलप्रमाणे आहेत :

१. काही परीक्षकांना मूल्यांकन केंद्राचे रीतसर नियुक्ती पत्र मिळूनही ते मूल्यांकन केंद्रावर उपस्थित होत नाहीत. अनेक वेळा संपर्क करुनही ते मूल्यांकनाच्या कार्यास सहकार्य करत नाहीत.

२. काही परीक्षक मूल्यांकन केंद्रावर उपस्थित होतात, मात्र उत्तरपत्रिकांचे एखादे बंडल घेऊन त्यातील १०-२० उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करुन उर्वरित उत्तरपत्रिका तशाच शिल्लक ठेवून नंतर मूल्यांकनासाठी येतच नाहीत.

३. विविध अभ्यासक्रमाच्या काही विषयांसाठी शिक्षकांची संख्या कमी आहे, परंतू असे विशेष शिक्षक मूल्यांकनासाठी अनेकवेळा बोलावूनही उपस्थित होत नाहीत, हीच बाब कमी विद्यार्थी संख्या असलेल्या अभ्यासक्रमाच्या विषयांसाठीही आहे, सदरचे शिक्षक मूल्यांकनासाठी उपस्थित होत नाहीत.

४. प्राचार्यांना त्यांच्या महाविद्यालयातील शिक्षकांना मूल्यांकनासाठी पाठवावे अशी जिल्हा मूल्यांकनाच्या प्रमुखाकडून केली जाते. त्यामुळे उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन लांबत जाते आणि निकाल उशीरा लागतात. निकाल वेळेवर लागण्यासाठी सहकार्य करावे, परंतू महाविद्यालयात नॅकसह इतर कामे आहेत, असे सांगून शिक्षकांना प्राचार्य कार्यमुक्त करत नाहीत.

@@TOK0@@ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद – ४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)
नॅक 'अ' दर्जा प्राप्त

प्राध्यापक बी.ए. चोपडे
एम. एस्सी., पीएच.डी. (नॉटींगहॅम विद्यापीठ, इंग्लंड)
फॉगर्टी फेलो (इलीनॉइस विद्यापीठ, शिकागो, यू. एस. ए.)
कुलगुरू

दुरध्वनी : ०२४०–२४०३३९९/२४०३४००
कार्यालय : ०२४०–२४०३१११
फॅक्स : ०२४०–२४०३११३/२४०३३३५
E-mail : vc@bamu.net
Website : www.bamu.ac.in



उपरोक्त बाबी विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका मूल्यांकन व निकाल विहित मुदतीत लागणे यासाठी अत्यंत गंभीर आहेत. म्हणून सर्व प्राचार्यांना आवाहन करतो की, आपल्या महाविद्यालयात कार्यरत, विद्यापीठ मान्यताप्राप्त अनुभवी अशा सर्व शिक्षकांना तात्काळ मूल्यांकन केंद्रावर मूल्यांकनासाठी पाठवावे.

आपण सर्वप्रथम विद्यार्थी हीत जपले पाहिजे, सर्वप्रथम मूल्यांकनाचे कार्य व परीक्षचे कार्यास प्राधान्य द्यावे, मूल्यांकनाचे कार्य आटोपल्यानंतर शिक्षकांना अन्य कामे सोपवावीत, परंतु मूल्यांकनासाठी महाविद्यालयातील इतर कार्य सोपवले आहे म्हणून शिक्षकांना कार्यमूक्त करता येणार नाही, असे कारण पुढे करण्यात येऊ नये.

शिक्षक कार्यमुक्त झाल्यानंतर त्यांना आवाहन करण्यात येते की, ते शिकवत असलेल्या विषयाच्या जास्तीत जास्त उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन/मॉडरेशन करावे, मूल्यांकन केंद्रावर पूर्णवेळ हजर राहून विद्यापीठास सहकार्य करावे. मूल्यांकन केंद्रावरील आपल्या विषयाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन संपल्याशिवाय केंद्र सोडू नये.

निकाल विहित मुदतीत जाहीर करण्यात यावी, अशी तरतूद महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियमात आहे, तशीच परीक्षेच्या कार्यात टाळाटाळ केल्यास शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची तरतूदही अधिनियमात आहे. त्यामुळे सर्व प्राचार्यांना विनंती आहे की, त्यांनी महाविद्यालयातील विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांना तात्काळ मूल्यांकनास पाठवावे.

यापूढे कुठल्याही मूल्यांकन केंद्राच्या प्रमुखांकडून शिक्षक मूल्यांकनासाठी उपस्थित राहिले नाहीत, शिक्षकांनी उत्तरपत्रिकांचे बंडल अपूर्ण सोडून नंतर ते मूल्यांकनासाठी उपस्थित राहिले नाहीत, कमी विद्यार्थी संख्या असलेल्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन शिक्षकांअभावी थांबले, अशा तक्रारी प्राप्त होऊ नये अशी आपणा सर्वांकडून अपेक्षा करतो. तसेच महाविद्यालयातील इतर कामे मूल्यांकनाचे कार्य झाल्यानंतर शिक्षकांना सोपविण्यात यावी,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास नॅक-अ दर्जा प्राप्त झालेला आहे, विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी व विद्यापीठाला जागतिक दर्जा मिळवून देण्यासाठी सर्वांना मिळून सांघिक प्रयत्न करावयाचे आहेत, म्हणून आपणा सर्वांची विद्यापीठाच्या सर्व कार्यात सहभागी होण्याची आवश्यकता आहे व ते क्रमप्राप्तही ठरते.

सबब, सर्व प्राचार्यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी गृह परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन तात्काळ करवून घ्यावे. लगेचच कार्यरत शिक्षकांना मूल्यांकन केंद्रावर रुजू होणेसाठी पाठवावे व त्यासंबंधीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

BAChopade
20/10/2015

प्रोफेसर बी.ए. चोपडे
कुलगुरू